# प्रेसनोट

दि.०१/०२/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३२१४/२०१६ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | अनंत सुरेश तरवडे, विशेष लेखा परिक्षक, वर्ग–२, सहकारी संस्था (फिरते पथक), अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ३०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ३०,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, आरोपी लोकसेवक अनंत सुरेश तरवडे, विशेष लेखा परिक्षक, वर्ग–२, सहकारी संस्था (फिरते पथक), अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडेस त्यांनी सन १९९६ ते सन २०१२–२०१३ या कालावधीतील वसंत दादा सहकारी पतसंस्था, टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर, जि.अहमदनगर या संस्थेचे झालेल्या लेखा परिक्षणा संदर्भात सहकार खात्याकडे केलेल्या तक्रारी अर्जाची चौकशी करुन वरिष्ठांना अहवाल सादर करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे दि.२५/१०/२०१६ रोजी पंचासमक्ष ३०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले होते. त्यांच्याविरुध्द कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर येथे दि.२५/१०/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>सदर सापळा कारवाई इरफान शेख, तत्कालीन पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांनी केली होती व त्यांनी गुन्हयाचा तपास पूर्ण करुन मा.विशेष न्यायालय, अहमदनगर येथे नमुद आरोपीविरुध्द दि.२१/६/२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.<br>सदर खटल्याची सुनावणी मा.श्री.अे.एम. शेटे, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे समोर होऊन पोलीसांनी केलेला चांगला तपास व महत्वाच्या साक्षीच्या आधारे मा.न्यायालयाने आरोपी लोकसेवक अनंत सुरेश तरवडे यांना आज दि.०१/०२/२०२२ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे ४ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ५०,०००/– रुपये दंड तसेच दंड न भरल्यास २ महिने साधी कैद तसेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम १३(२) प्रमाणे ४ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ५०,०००/– रुपये दंड तसेच दंड न भरल्यास २ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.<br>सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे ॲड.व्ही.के.बोर्डे, सहायक सरकारी अभियोक्ता, अहमदनगर यांनी काम पाहिले असून त्यांना मपोना.संध्या म्हस्के यांनी मदत केली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर